
3 र्‍या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स

प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !
पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी... epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

ईश्वर टी अ‍ॅण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी

प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४६५ वा • मंगळवार, ता. ०९ डिसेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## ज्यांच्या पितृसंघटनेने कधी राष्ट्रगीत गायले नाही, तिरंगा फडकवला नाही, तेच आज वंदे मातरमचे कौतुक करतात

**नवी दिल्ली । रयत समाचार**

वंदे मातरम वादावर राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार अरविंद सावंत यांनी सत्ताधारी पक्षावर जोरदार टीका केली आहे. ''आज वंदे मातरमचे कौतुक करणारे लोक तेच आहेत, ज्यांच्या पितृ संघटनेने ५० वर्षे कधीही कार्यालयावर राष्ट्रगीत गायले नाही किंवा तिरंगा ध्वज फडकवला नाही,'' अशी टीका त्यांनी केली. संसदेत वंदे मातरमवरील चर्चे दरम्यान त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणावरही टिका केली.

सावंत म्हणाले की, ''डॉ. हेडगेवार आणि गुरु गोलवलकर यांच्या कोणत्याही पुस्तकात वंदे मातरमचा उल्लेख असल्यास तो दाखवावा. आज जे लोक राष्ट्रवादाचे ठेकेदार बनतात, त्यांनीच स्वातंत्र्याच्या आंदोलनात भाग घेतला नाही.''

ते पुढे म्हणाले की, देशातील संस्था न्यायव्यवस्था, सीबीआय, ईडी,



आयकर विभाग आणि निवडणूक आयोग कोणतीही स्वतंत्र राहिलेली नाही. ''या संस्था आत्मभानाने काम करत नाहीत. देशामध्ये न्याय मागणाऱ्यांनाच संघर्ष करावा लागतो. त्यामुळे पुन्हा एकदा स्वातंत्र्याची आणि आत्मनिर्भरतेची लढाई लढावी लागेल,'' असे ते म्हणाले.

कर्नाटक-महाराष्ट्र सीमावादाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, बेळगाव-कारवार-निपाणी परिसरातील नागरिक ६० वर्षांपासून आंदोलन करत आहेत; पण त्यांना अजूनही न्याय मिळालेला नाही.

**सावंत यांनी महाराष्ट्रातील स्वातंत्र्य संग्रामातील बलिदानांची आठवण करून दिली.**
''नंदुरबारमधील १४ वर्षीय शिरीषकुमारला १९४२ मध्ये तिरंगा फडकवत 'वंदे मातरम' म्हणत असताना इंग्रजांनी ठार केले. मुंबईतील ऑगस्ट क्रांती मैदानात अरुणा आसफ अली यांनी सर्व नेत्यांना अटक झाल्यानंतर तिरंगा फडकवून 'वंदे मातरम'चा नारा दिला,'' असे ते म्हणाले.

समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनीही भाजपवर तीव्र टीका करत म्हटले की, ''सत्ता पक्ष प्रत्येक गोष्टीवर मालकी हक्क दाखवू इच्छितो. जे महापुरुष त्यांच्या नाहीत त्यांना स्वतःचे म्हणून दाखवण्याचा प्रयत्न केला जातो.'' त्यांनी असा आरोप केला की, ''पूर्वीही काही लोकांनी देशाशी दगाबाजी केली आणि आजही करत आहेत.'' यादव पुढे म्हणाले की, ''वंदे मातरम हे फक्त गाणे नाही, ते निभावण्याची जबाबदारी आहे. पण आज भेद पाडणारे लोक त्याच संकल्पनेचा वापर करून देशाला तोडण्याचा प्रयत्न करत आहेत.'' या चर्चेमुळे संसदेमध्ये सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये तीव्र शब्दयुद्ध रंगले.

## विधानसभा अधिवेशन सुरू; सीमाभागात तणाव, पोलिसांकडून धरपकड

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

कर्नाटक विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनाला काल ता. ८ डिसेंबर रोजी बेळगावात सुरुवात झाली असून सीमाभागात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. मराठी भाषिकांच्या दीर्घकाळ प्रलंबित मागण्यांकडे लक्ष देण्याची मागणी पहिल्याच दिवशी जोरदारपणे करण्यात येत असताना, कर्नाटक सरकारकडून मुस्कटदाबीची भूमिका घेतल्याचे चित्र समोर आले आहे.



बेळगाव आणि खानापूर येथील महाराष्ट्र एकीकरण समितीच्या अनेक नेत्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. दरवर्षी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी मराठी भाषिकांचा महामेळावा आयोजित केला जातो. मराठी ओळख, हक्क आणि न्यायासाठी लढणारे हे व्यासपीठ सीमाभागातील मराठी बांधवांचे धैर्यस्थान मानले जाते. यंदाही मोठ्या प्रमाणात उपस्थिती अपेक्षित असल्याने कर्नाटक सरकारने संभाव्य विरोधाची धास्ती घेत महामेळाव्यास परवानगी नाकारली.

यानंतर मराठी एकीकरण समितीच्या नेत्यांना ताब्यात घेऊन आंदोलने रोखण्याचा प्रयत्न करण्यात आला. या निर्णयावर स्थानिक मराठी नागरिकांसह महाराष्ट्रातही तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी निषेधासाठी रस्त्यावर उतरत कर्नाटक सरकारविरोधात घोषणाबाजी केली. कोल्हापूर एसटी स्टँडवर कर्नाटक परिवहन मंडळाच्या बसेस अडवून आंदोलन करण्यात आले.

मराठी जनतेच्या आंदोलनावर होणारी मुस्कटदाबी सहन केली जाणार नाही, असा इशारा निषेधकर्त्यांनी दिला आहे. सीमाभागातील तणाव वाढत असताना पुढील काही दिवसांत परिस्थिती कशी बदलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महाराष्ट्र तोडण्याचा भाजपचा डाव? बावनकुळेनीच दिली कबुली

**नागपूर । रयत समाचार**

विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनाला सोमवारी नागपूर येथे सुरुवात झाली आणि त्याच पार्श्वभूमीवर वेगळ्या विदर्भाचा मुद्दा पुन्हा एकदा केंद्रस्थानी आला आहे. ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येलाच जोरदारपणे मांडली. यामुळे राजकीय वातावरण तापले असताना, राज्याचे महसूलमंत्री आणि भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे.
बावनकुळे म्हणाले, ''वेगळ्या विदर्भाबाबत भाजपची भूमिका कायम आहे. आम्ही या मुद्द्यावर सुरुवातीपासूनच काम करत आहोत.'' ते एका खासगी वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलत होते. त्यांनी पुढे सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील नेहमीच विदर्भ राज्याच्या बाजूने भूमिका घेतली आहे.

काँग्रेसने उपस्थित केलेल्या प्रश्नाला प्रत्युत्तर देताना बावनकुळे म्हणाले, ''वेगळ्या विदर्भाचा मुद्दा हा भाजपच्या मूलभूत अजेंड्यातील आहे. काँग्रेस आता हा विषय पुढे करत असली तरी हा मूळ मुद्दा आमचाच आहे.'' दरम्यान, गेल्या अनेक वर्षांपासून विदर्भातील नागरिकांकडून स्वतंत्र राज्याची मागणी होत आहे. विकासाचा अनुशेष आणि दुर्लक्षित होत असल्याची भावना या मागणीला बळ देत आहे. वडेट्टीवार यांनीही विदर्भात ओबीसी, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्यांक समाजाचे संख्यात्मक प्राबल्य असूनही सत्ता मिळण्यात दुय्यम स्थान मिळत असल्याचा आरोप केला. यावर ''जोपर्यंत सत्ता मिळत नाही, तोपर्यंत न्याय मिळू शकत नाही. त्यामुळे वेगळा विदर्भ आवश्यक आहे,'' असे ते म्हणाले.



मात्र महाराष्ट्र एकसंध रहावा यासाठी प्रयत्न करणाऱ्या सामान्य मराठी माणसांमध्ये यामुळे संतापाची भावना पसरली असून भाजपच महाराष्ट्र तोडायला निघाल्याची चर्चा सुरू झाली आहे.

हिवाळी अधिवेशनाच्या सुरुवातीलाच हा मुद्दा पेटल्याने आगामी दिवसांतही या विषयावर तीव्र चर्चा होण्याची शक्यता आहे.

## एमपीएससी परीक्षा २१ ऐवजी ४ व ११ जानेवारीला

**मुंबई । शफीक बागवान**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा ता. २१ डिसेंबर २०२५ रोजी होणारी ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली. त्यासाठीचे नवे वेळापत्रकही जाहीर करण्यात आले आहे. ही परीक्षा आता २१ डिसेंबर ऐवजी ४ आणि ११ जानेवारीला होणार आहे.

राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४८ नगरपंचायती निवडणुकीच्या मतमोजणीमुळे २१ डिसेंबर रोजीची एमपीएससी पूर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आली. नव्याने परीक्षेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या असून ४ जानेवारी आणि ११ जानेवारी २०२६ रोजी परीक्षा होणार आहे. यासंदर्भातील शुध्दीपत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे, अशी माहिती आयोगाने दिली असून परीक्षार्थींनी याची नोंद घ्यावी असेही आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा- २०२५ च्या परीक्षेचे आयोजन ता. २१ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ११ ते १२ या कालावधीत करण्यात आले होते.

तथापि, राज्यातील नगर परिषद व नगर पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूका २०२५ कार्यक्रमांतर्गत राज्य निवडणूक आयोगाच्या ता. ०२ डिसेंबर, २०२५ रोजीच्या आदेशानुसार मतमोजणी ता. २१ डिसेंबर, २०२५ रोजी करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना निर्देशित केले आहे. आयोगामार्फत आयोजित परीक्षा व मतमोजणी एकाच दिवशी म्हणजेच २१ डिसेंबर, २०२५ रोजी असल्याने त्यासंदर्भात काही मुद्यांच्या अनुषंगाने राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांकडून माहिती मागविण्यात आली होती.

## बाबा आढाव यांचे निधन

**पुणे । रयत समाचार**

समाजवादी चळवळीचे ज्येष्ठ नेते आणि 'एक गाव, एक पाणवठा' मोहिमेचे प्रणेते डॉ. बाबा आढाव (९४) यांचे पुण्यातील खासगी रुग्णालयात निधन झाले. मागील १३ दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. १ जून १९३० रोजी जन्मलेल्या आढाव यांनी समाजवादी पक्षातून राजकारण करत १९७० च्या दशकात पुणे महापालिकेचे नगरसेवक म्हणून काम पाहिले. रिक्षा पंचायतीचे नेतृत्व आणि समानता चळवळीतील सक्रिय सहभागामुळे त्यांना राज्यभर विशेष ओळख मिळाली आयुष्यभर सामाजिक न्यायासाठी लढताना ५५ वेळा तुरुंगवास भोगण्याची वेळ त्यांच्यावर आली.

## व्लादिमीर पुतिन आणि गोदी मीडियाचे धिंडवडे !

**रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन हे भारताच्या दोन दिवशीय दौऱ्यावर नुकतेच येऊन गेले. त्याआधी त्यांनी रशियाची राजधानी मॉस्कोमध्ये इंडिया टुडे व आज तकला एक्स्क्लुझिव्ह मुलाखत दिली. ही मुलाखत इंडिया टुडेच्या परराष्ट्र व्यवहार संपादक गीता मोहन आणि सीनियर मॅनेजिंग एडिटर अंजना ओम कश्यप यांनी घेतली. या दोघीही गोदी मीडियाच्या सोनपऱ्या म्हणून ओळखल्या जातात. नवी दिल्लीतील साऊथ ब्लाकमधील शासकीय बँडबाजावाल्यांनी या मुलाखतीचे आयोजन केले होते. या मुलाखतीत विचारले गेलेले प्रश्न आणि प्रश्नकर्त्या पत्रकार भगिनींची देहबोली पाहिल्यानंतर भारतीय पत्रकारितेच्या अकलेचे उरलेसुरले धिंडवडे काढण्यासाठीच या मुलाखतीचे प्रयोजन होते की काय असे तीव्रतेने वाटू लागते. व्लादिमीर पुतिन हे केवळ जगातील एक महासत्ता असलेल्या सोव्हिएत युनियनचे अध्यक्ष नाहीत. ते जगाच्या दुसऱ्या ध्रुवाचे नेतेही नाहीत. तर ते जगातील सर्वात शक्तिशाली राजकारण्यांपैकी एक आहेत. अमेरिकन व युरोपीयन टगेगिरीला पुरून उरत त्यांनी ठेवलेला त्यांचा ताठ कणा, जग नियंत्रित करू पाहणाऱ्या आंतरराष्ट्रीय कार्पोरेट माफियांना त्यांची वेळोवेळी जागा दाखवून देत त्यांनी दाखवलेले वेगळेपण, धडाडी, मुत्सद्देगिरी आणि त्यांचे धाडस यांना सीमा नाही. ते रशियाचे हुकुमशहा असले तरी भारताचे पारंपरिक मित्र आहेत.**

ते एक निर्णायक व्यक्ती आहेत जे युरोपीयन दादागिरीवर उघडपणे बोलतात आणि त्यांच्या मुद्द्यावर ठाम राहतात. अशा महनीय व्यक्तीच्या मुलाखतीला जायचे तर किती तयारी हवी, याचे भान ठेवले गेले नाही. जगातील एक महनीय व्यक्ती समोर बसलेली असताना आपण कसे बसावे, हातवारे करून बोलावे की नाही, याचे किमान भानही राखले गेले नाही.

या महत्त्वाच्या मुलाखती दरम्यान अतिशय काळजीपूर्वक प्रश्न विचारून भारताच्या परराष्ट्र धोरणाचा मार्ग मोकळा करण्याची अतिशय मोठी संधी चालून आली होती. पण या सोन्यासारख्या संधीचे मातेरे केले गेले, असेच म्हणावे लागेल.



व्लादिमीर पुतिन हे अशा देशाचे प्रमुख आहेत ज्याकडे प्रचंड तेल आणि खनिज संपत्ती आहे. त्यांच्याकडे प्रचंड लष्करी शक्ती आहे. त्यांच्याकडे भारताला देण्यासाठी खूप काही आहे. म्हणून, जागरूक पत्रकार अशा गोष्टी काढण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक करतात, ज्या सार्वजनिकरित्या उघड केल्या जात नाहीत. दुर्दैवाने व्लादिमीर पुतिन यांची मुलाखत घेणाऱ्या दोघींनी ही संधी अक्षरशः वाया घालवली.

**या मुलाखतीत आंबा चोखून खाता की कापून, अशा बालिश स्वरूपाचे प्रश्न विचारले गेले. खरे तर या मुलाखतीत खालीलप्रमाणे प्रश्न विचारता आले असते.**
१. रशिया भारताला उत्तर सागरी मार्गावर कायमचा भागीदार बनवेल का? ते चेन्नई-व्लादिवोस्तोक सागरी कॉरिडॉर संयुक्तपणे विकसित करण्याचा विचार करत आहे का? एकट्या रशियाकडे आर्क्टिकमध्ये गुंतवणूक करण्यासाठी अब्जावधी डॉलर्स आहेत. जर भारत भागीदार झाला तर आपल्याला युरोपला जाण्यासाठी चीन-मुक्त मार्ग मिळेल, जो सुएझ कालव्यापेक्षा ४०% स्वस्त असेल.
२. ब्रिक्समध्ये सोन्यावर आधारित नवीन पेमेंट सिस्टम विकसित करण्यासाठी रशिया भारतासोबत काम करेल का? अमेरिकेने डॉलर सोन्यापासून वेगळे करून चलन छपाई कारखाना तयार केला आहे. रशियाने तेथे ३०० अब्ज डॉलर्स गोठवले आहेत. जर पुतिन हो म्हणाले, तर भारत जागतिक डी-डॉलरायझेशनमध्ये एक प्रमुख खेळाडू बनेल.
३. युक्रेन युद्धानंतरच्या नवीन जागतिक व्यवस्थेत, रशियाला भारत स्वतंत्र ध्रुव बनू इच्छित आहे का? की तो पूर्णपणे अमेरिका/चीनसोबत उभा राहिला पाहिजे? रशियाला भीती आहे की क्वाडद्वारे भारत अमेरिकेच्या छावणीत ओढला जाईल. पुतिन यांच्या होकारामुळे भारताच्या धोरणात्मक स्वायत्ततेला रशियाचा पाठिंबा मिळेल.
४. मेक-इन-इंडिया अंतर्गत रशिया एस-५००, एसयू-५७, हायपरसोनिक क्षेपणास्त्रे आणि अणु पाणबुड्यांचे संपूर्ण तंत्रज्ञान भारताला हस्तांतरित करेल का? रशियाची अर्थव्यवस्था निर्बंधांमुळे अडचणीत आहे. त्याला भारताकडून मोठ्या ऑर्डरची आवश्यकता आहे. जर हो असेल, तर भारत ८-१० वर्षांत पाचव्या पिढीचे सैन्य बनेल.
५. सांस्कृतिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या, भारत-रशिया संबंध चीनपेक्षा खूप खोलवर जातात. रशियाला असे वाटते का की भारत दीर्घकाळात चीनपेक्षा अधिक विश्वासार्ह भागीदार ठरू शकतो? व्लादिमीर पुतिन यांनी या प्रश्नांना राजकीय परंतु सकारात्मक उत्तर दिली असती. त्यांना माहिती आहे की चीन देखील त्याच्या भूभागावर अतिक्रमण करत आहे आणि भविष्यात तो प्रतिस्पर्धी बनेल. भारतासारख्या पारंपरिक मित्राला सोबत ठेवणे म्हणून रशियाची गरज आहे.
६. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या विस्तारात रशिया भारताच्या कायमस्वरूपी सदस्यत्वाला उघडपणे पाठिंबा देईल का? रशिया संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत एकटे पडल्यासारखे वाटत आहे. त्याला भारतासारख्या कायमस्वरूपी भागीदाराची आवश्यकता आहे. पुतिन यांच्या होकारामुळे जवळजवळ आपली जागा निश्चित होईल.
७. जर उद्या नाटो-रशिया किंवा अमेरिका-चीन यांच्यात महायुद्ध सुरू झाले, तर रशिया भारताच्या तटस्थ पण रशिया समर्थक धोरणाचा आदर करेल का? रशियाला अशी हमी हवी आहे की भारत ते सोडणार नाही. जर त्याला होकार मिळाला, तर तो भारताला भविष्यातील मोठ्या युद्धात ''सुरक्षित तटस्थता'' राखण्याचा परवाना देईल.
८. रशिया पुढील २०-२५ वर्षांसाठी भारताला सवलतीच्या दरात तेल, वायू, कोळसा आणि युरियाची हमी देऊ शकेल का? रशियाने युरोपीय बाजारपेठ गमावली आहे. भारत त्याचा सर्वात मोठा, सर्वात विश्वासार्ह खरेदीदार आहे. २०४७ पर्यंतची आपली ऊर्जा आणि अन्न सुरक्षा त्यांच्या मजुरीमध्ये आहे.



**प्रभाकर ढगे**
समूह संपादक, गोवा
93730 21584
विश्ववार्ता

अधिक प्रश्न विणता आले असते. पण असे प्रश्न ''ट्रॅक्टर-ट्रॉली टक्कर'' आणि ''तुम्ही का थकत नाही?'' याबद्दल बोलणाऱ्या पत्रकारांना पडत नाहीत, कल्पना करा, ही त्यांच्या कारकिर्दीतील सर्वात मोठी मुलाखत होती. गीता मोहन आणि अंजना कश्यप यांनी काय विचारले या मुलाखतीत ? वानगीदाखल पहा. ''तुमच्या कार्यकाळात सेवा दिलेल्या सर्व भारतीय पंतप्रधानांमध्ये, तुम्हाला सर्वात महान कोण वाटते?'' काय अपेक्षित होते? पुतिन मुठी वर करून ''यावेळी ४०० पेक्षा जास्त, जर मोदी असतील तर ते शक्य आहे'' असे म्हणतील का? उत्तर होते: ''दुसऱ्या देशाच्या नेत्यांचे अशा प्रकारे वर्गीकरण करणे अयोग्य आहे.' ही संधी वाया घालवली. परराष्ट्र मंत्रालयाने प्रश्न पाहिले असतील आणि त्यांना मान्यता दिली असेल.

**तरीही त्यांना विचारण्यात आले होते. त्यांनी प्रश्नांची यादी तयार करायला हवी होती आणि जर त्यांना हवी असलेली उत्तरे मिळाली नाहीत तर त्यांनी प्रति-प्रश्न तयार करायला हवे होते. पण नाही**

नोएडात बसून गोदी मुडियाच्या अंगणात नाचणाऱ्या पऱ्या आणि साउथ ब्लॉकचे संगीतकार त्यांच्या पितृसत्ताक पूर्वजांची पूजा करण्यापलीकडे वेगळा विचार करू शकत नाहीत. म्हणून, भारत चेन्नई-व्लादिवोस्तोक सागरी मार्ग, गॅस, तेल आणि युरियासाठी दीर्घकालीन स्वस्त सौदे याविषयी काही पदरात पडेल असे वाटत नाही. ब्रिक्स चलन देखील मिळेल की नाही, याविषयी साशंकता आहे. ''पुतिन यांनी मोदींची प्रशंसा केली'' हेच आपल्या परराष्ट्र धोरणाचे ध्येय ठरले आणि पुतिनचे मलमूत्र त्यांचे सुरक्षा रक्षक परत घेऊन गेले, हे आमचे बीग ब्रेकिंग न्यूज बनले. **भारतीय पत्रकारितेचे लाजीरवाणे प्रदर्शन मांडण्यासाठीच ही मुलाखत घेतली गेली असावी का?**

# विद्यार्थ्यांच्या आरोग्य संवर्धनासाठी किड्स सेकंड होम स्कुलचा उपक्रम आदर्श- बोज्जा



**अहमदनगर । रयत समाचार**

प. पु. माताजी श्री निर्मलादेवी प्रणित विश्व निर्मल फाऊंडेशन संचलित किड्स सेकंड होम प्री-प्रायमरी सहज पब्लिक स्कूल येथे आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन उत्साहात पार पडले. कार्यक्रमात मनपा सभापती कुमार वाकळे, उद्योजक बाबुशेठ नागरगोजे, माजी नगरसेविका विणा बोज्जा, तसेच डॉ. बिभीशन मिसाळ, डॉ. अनिकेत यादव, डॉ. वर्षा धापटकर आदी मान्यवर उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी बोलताना विना बोज्जा म्हणाल्या की, किड्स सेकंड होम स्कूलमध्ये शिक्षणाबरोबरच अध्यात्मिक संस्कार दिले जातात, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात चांगले गुण रुजतात. शाळेत सातत्याने घेतले जाणारे मोफत आरोग्य शिबिरे ही स्तुत्य बाब असून इतर शैक्षणिक संस्थांनीही हा आदर्श घ्यावा. तसेच कुमार वाकळे म्हणाले, बोल्हेगावातील किड्स सेकंड होम स्कूलने आपल्या कामातून लौकिक मिळवला आहे. विद्यार्थ्यांसाठी पोषक, सुरक्षित आणि विकासाभिमुख वातावरण निर्माण करणे ही शाळेची वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे.

कार्यक्रमाची सुरूवात प. पु. माताजी निर्मलादेवी यांच्या प्रतिमेस हार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. शिबिरात डॉ. मिसाळ, डॉ. यादव आणि डॉ. धापटकर यांनी सर्व विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करून आवश्यक औषधे वितरित केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास बोज्जा यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत मुख्याध्यापिका संगीता गांगर्डे, तर आभार प्रदर्शन दिपाली हजारे यांनी केले. सूत्रसंचालन अर्चना भाटे यांनी केले.

शिबिर यशस्वी होण्यासाठी रुपाली जोशी, अर्चना चव्हाण, अर्चना भाटे, अनिता गायकवाड, सुनंदा गाडे, लीना काळे, शुभम होले (व्यवस्थापक) आदींनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांसह पालकांचा मोठ्या उत्साहाने सहभाग होता.

# बिबट जेरबंद करण्यासाठी पिंजऱ्यांची संख्या वाढवा

**अहमदनगर । रयत समाचार**

केडगाव परिसरात काही दिवसांपासून बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर वैभव पाचारणे यांनी वनपरीक्षेत्र अधिकाऱ्यांना निवेदन देऊन पिंजऱ्यांची संख्या वाढविण्याची मागणी केली आहे.

परिसरातील विविध भागांत बिबट्याचे दर्शन झाल्याने शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिक दहशतीत असून, संध्याकाळनंतर गावात हालचाल कमी झाली आहे. पाचारणे यांनी सांगितले की, वन विभागाच्या सध्याच्या उपाययोजना अपुऱ्या असून उपलब्ध पिंजरेही कमी आहेत. अधिकाऱ्यांशी संपर्क साधल्यावर ''पिंजरे उपलब्ध नाहीत'' असे समजल्याने नागरिकांच्या सुरक्षेविषयी प्रश्न उपस्थित होत आहेत. बिबट्याला तातडीने जेरबंद करण्यासाठी अतिरिक्त पिंजरे, वाढीव गस्त आणि आवश्यक असल्यास इतर विभागांतून पिंजरे मागवावेत, अशी मागणी पाचारणे यांनी केली.



# आस्मा शेख यांचा भारतरत्न मौलाना अबुल कलाम आजाद शिक्षक पुरस्काराने सन्मान

**अहमदनगर । आबीद खान**

जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा, केडगाव येथील निवृत्त मुख्याध्यापिका आस्मा अशफाक शेख यांना भारतरत्न मौलाना अबुल कलाम आजाद शैक्षणिक पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला. मखदुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी तसेच अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेतर्फे देण्यात येणारा हा मानाचा सन्मान सर्जेपूरा येथील रहेमत सुलतान सभागृहात आयोजित कार्यक्रमात त्यांना प्रदान करण्यात आला.

आस्मा शेख यांनी २००६ पासून उर्दू प्राथमिक शाळा केडगाव येथे मुख्याध्यापिका म्हणून कार्य सुरू केले. २००७ मध्ये संपूर्ण हागणदारी मुक्त गाव मोहिमेअंतर्गत त्यांच्या शाळेला पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. २०१४ मध्ये शाळेला ९००१ प्रमाणपत्र प्राप्त झाले. २०२०२१ मध्ये पाचवीचा वर्ग सुरू करण्यात आला. २०२२२३ मध्ये पाचवीपर्यंतचे वर्ग एकट्याने सांभाळत सलग तीन वर्ष पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत उत्कृष्ट निकाल प्राप्त करण्याची कामगिरी त्यांनी साधली.



शाळेला वॉल कंपाउंड नसल्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी २०२३ मध्ये मिशन आरंभच्या माध्यमातून काही पालकांचे सहकार्य आणि स्वतःचे ७० हजार रुपये मिसळून सुमारे एक लाख रुपयांत ५० मीटरचे तार-कंपाउंड व मोठा प्रवेशद्वार उभारण्यात त्यांनी पुढाकार घेतला. सुरुवातीला ३०३२ विद्यार्थ्यांची संख्या असलेली शाळा आज ५१ विद्यार्थ्यांपर्यंत वाढली आहे. शाळेतील विविध शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठीचे नियोजन आणि उर्दू शाळा म्हणून केडगाव केंद्रातील एकमेव शैक्षणिक संस्था टिकविण्यात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे.

कार्यक्रमात अँग्लो उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, संगमनेरचे मुख्य विश्वस्त अब्दुल्ला हसन चौधरी, चेअरमन हाजी शेख गनी आणि शिक्षक नेते बापूसाहेब तांबे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी मखदुम एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आबिद दुल्हेखान, डॉ. कमर सुरूर, जिल्हा उर्दू साहित्य परिषदेचे सलीम खान पठाण, मौलाना आझाद महोत्सव समितीचे अध्यक्ष भैरवनाथ वाकळे व सचिव युनूसभाई तांबटकर आदी उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारताना आस्मा शेख यांनी आपल्या कार्याचे कौतुक झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. शिक्षकांवर वाढत्या कामकाजाच्या ताणातही विद्यार्थ्यांसाठी उपक्रम राबविणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्याची गरज असल्याचे मान्यवरांनी भाषणातून नमूद केले.

# स्वामी समर्थ मंदिरात दत्तजयंती सप्ताहाची उत्साहात सांगता



**अहमदनगर । विजय मते**

छत्रपती संभाजीनगर रोडवरील तपोवन येथील श्री स्वामी समर्थ तपोवन केंद्रात दत्त जन्मोत्सव सप्ताहाची सांगता महानैवेद्य, महाआरती आणि महाप्रसादाने भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडली. सावेडी उपनगरातील तपोवन केंद्रात दत्त जयंतीनिमित्त भव्य पारायण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात सुमारे ३५० महिलांनी सामूहिक श्री गुरुचरित्र पारायण केले. सात दिवस अखंड नामजप, नित्यनियमाने पारायण, आरत्या आणि विविध धार्मिक कार्यक्रमांनी परिसरात अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले. दिंडोरी प्रणित गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपोवन केंद्रात वर्षभर विविध धार्मिक उपक्रम राबवले जातात. केंद्रातील बाल संस्कार वर्गांमुळे उत्तम विद्यार्थी घडत असल्याचेही मान्यवरांनी नमूद केले. सप्ताह सांगतेनिमित्त केंद्र प्रतिनिधी श्री व सौ. सोनाली बबन पालवे यांच्या हस्ते महानैवेद्य अर्पण करून महाआरती करण्यात आली. याप्रसंगी माजी नगरसेवक निखिल वारे, सुनील त्र्यंबके, बाळासाहेब पवार, विनीत पाऊलबुधे, माजी नगरसेविका रूपाली वारे, आकाश त्र्यंबके, रोशनी त्र्यंबके, एकनाथ खिलारी यांसह स्वामी समर्थ सेवा मंडळाचे सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सप्ताहात जिल्हा बँकेचे संचालक अक्षय कर्डिले आणि संदीप कर्डिले यांनीही उपस्थित राहून केंद्रातील विविध उपक्रमांची पाहणी केली आणि संतुष्टी व्यक्त केली. महानैवेद्य आणि महाआरतीनंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. सप्ताह यशस्वी करण्यासाठी तपोवन केंद्राचे सर्व सेवेकरी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल बबन पालवे यांनी सर्वांचे आभार मानले.

# मालमत्ता फेरसर्वेक्षणासाठी मनपाचे १५ कोटी खर्चाचे प्रस्तावित बिल कशासाठी?

## जनतेच्या पैशांची ही उघडी लूट काँग्रेसचा आरोप

**अहमदनगर । रयत समाचार**

महानगरपालिकेने खाजगी कंपनीकडून करण्यात आलेल्या बोगस फेरसर्वेक्षणामुळे नगरकरांवर वाढीव घरपट्टीचा अन्यायकारक बोजा टाकला असून, त्या कंपनीला १५ कोटी रुपये अदा करण्याचा प्रस्ताव ही जनतेच्या पैशांची सर्रास लूट असल्याचा आरोप काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष माजी नगराध्यक्ष दीप चव्हाण यांनी केला आहे.

चव्हाण यांनी जारी केलेल्या पत्रकात म्हटले आहे की, २०१३१५ मध्ये अवघ्या १ कोटी ५८ लाखांत स्ट्रेसा लाईट कंपनी (कोलकाता) कडून ८० हजार मालमत्तांचे सर्वेक्षण झाले होते. त्या कंपनीची १५ लाख अनामत रक्कम अद्याप पालिकेकडे थकीत असताना नव्या कंपनीला १५ कोटींचे काम देणे संशयास्पद आहे. १२ ऑगस्ट २०२१ रोजी तत्कालीन महापौर रोहिणी शेंडगे यांच्या कार्यकाळात ''करात वाढ न करण्याचा'' ठराव सभेत मंजूर होऊनही घरपट्टी वाढ कशी झाली? असा सवालही चव्हाण यांनी उपस्थित केला आहे. त्यांनी सांगितले की, दिल्ली येथील सीई इन्फोसिस्टम कंपनीला प्रति मालमत्ता शासनाने ठरवलेल्या २२० रुपयांच्या दराऐवजी ९५० रुपये ( सह) देण्याचा निर्णय तत्कालीन आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी घेतला. ''हा मोठा मलिदा लाटल्याशिवाय शक्य नाही'' असा आरोप त्यांनी केला. याच कंपनीने मनमानी सर्वेक्षण करून चुकीचे अहवाल दिल्याचे विद्यमान आयुक्त यशवंत डांगे यांनीही मान्य केले असल्याचे चव्हाण यांनी नमूद केले. खाजगी कंपनीने कर्मचाऱ्यांसोबत संगनमत करून मालमत्ता धारकांकडून पैसे उकळल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. ''नगरकरांसाठी सुविधा नाहीत, सर्व कामे ठेकेदारांकडे; मग पालिका निवडणुका घेण्यात काय अर्थ?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.२००५ ते २०२५ दरम्यान सत्ताधाऱ्यांनी आपल्या फायद्यासाठी घरपट्टी वाढवून नागरिकांना आर्थिक अडचणीत ढकलल्याचा



आरोपही त्यांनी केला. चव्हाण यांनी मागणी केली की, बोगस सर्वेक्षण करणाऱ्या कंपनीचे १५ कोटींचे बिल रद्द करावे, वाढीव घरपट्टी मागे घ्यावी आणि नवीन नियमांनुसार फेरसर्वेक्षण करावे. अन्यथा काँग्रेस रस्त्यावर उतरून आंदोलन करेल, गुन्हे शाखेत तक्रारी करेल आणि न्यायालयात लढा देईल, असा इशाराही त्यांनी दिला.

घरमालक संघटना, शेतकरी संघटना, मेडिकल असोसिएशन, हॉटेल-मंगल कार्यालये, पेट्रोल पंप, बार कौन्सिल आदी सर्व घटकांना सोबत घेऊन लढा उभारला जाईल असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५१ अन्वये ७ मार्च २०२४ रोजीचा प्रशासक ठराव क्रमांक ६७ रद्द करण्याची विनंती त्यांनी आयुक्तांकडे केली आहे.

# रेडिओलॉजी परीक्षेत श्रावणी शिंदे यशस्वी

**अहमदनगर । आबीद खान**

एम.डी. (रेडिओलॉजी) या अत्यंत प्रतिष्ठित आणि कठीण मानल्या जाणाऱ्या वैद्यकीय पदव्युत्तर परीक्षेत डॉ. श्रावणी शिंदे यांनी उल्लेखनीय यश मिळवले. त्यांच्या या कामगिरीमुळे कुटुंबासह समाजात आनंदाचे वातावरण आहे.



डॉ. श्रावणी यांनी आपले एमबीबीएस शिक्षण पुण्यातील शासकीय बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयातून पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी एम.डी. रेडिओलॉजीसाठी नामांकित भारती विद्यापीठात कठोर परिश्रम घेत या क्षेत्रात स्वतःची उत्कृष्ट कामगिरी सिध्द केली. सातत्यपूर्ण अभ्यास, आत्मविश्वास, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. यापूर्वीही डॉ. श्रावणी यांनी १० वी, १२ वी, तसेच नीट यूजी व नीट पीजी या परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवून शैक्षणिक क्षेत्रात आपली निरंतर प्रगती सिद्ध केली आहे.

डॉ. श्रावणी या अहिल्यानगर येथील किर्लोस्कर फेरस कंपनीचे प्लांट हेड चैतन्य शिंदे आणि मृणाल शिंदे यांच्या कन्या आहेत. त्यांच्या उज्वल यशाबद्दल विविध मान्यवरांनी, शिक्षकांनी आणि वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

भविष्यात त्या एक कुशल रेडिओलॉजिस्ट म्हणून सामाजिक आणि वैद्यकीय सेवेत मोलाचे योगदान देतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.


दैनिक रयत समाचारचा ख्रिसमस विशेषांक
गुरूवार, ता.२५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होत आहे

ख्रिसमस विशेषांक

अंकासाठी लेख, माहिती, जाहीराती पाठवाव्यात

अतिथी संपादक
सॅम्युअल वाघमारे
8788412780

संपादक
भैरवनाथ वाकळे
8805401800

रयत समाचार महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक

जाहीरात पाठविण्यासाठी संपर्क क्रमांक

भैरवनाथ- ८८०५४०१८००, दिपक- ७७७४००१८००,
तुषार- ७९७२३४४४७४, पंकज-९८२२४९६६६४


# बाळासाहेब देशपांडे रुग्णालयाचे कर्मचारी आर्थिक संकटात; ४ महिन्यांपासून वेतन रखडले

**अहमदनगर । रयत समाचार**

कै. बाळासाहेब देशपांडे रुग्णालयातील कंत्राटी कामगारांना गेल्या चार महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याने त्यांच्यावर गंभीर आर्थिक संकट ओढवले आहे. कामगारांच्या या बिकट परिस्थितीची दखल घेत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे मनपा प्रशासनाला तातडीने निवेदन देण्यात आले. विभागाध्यक्ष प्रशांत जाधव यांच्या पुढाकाराने हे निवेदन मनपा उपायुक्त तडवी सादर करण्यात आले.



महिला व बाल आरोग्यसेवेकरिता ओळखल्या जाणाऱ्या या रुग्णालयात डॉक्टर, लॅब टेक्निशियन, नर्स, परिचारिका, सफाई कर्मचारी आणि शिपाई अशा मोठ्या प्रमाणावर कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. शहरासह ग्रामीण भागातील अनेक रुग्ण उपचारासाठी येथे येत असताना, सेवा देणाऱ्या या कामगारांना मागील काही महिन्यांपासून ठेकेदारांकडून वेतन न मिळाल्याने त्यांची उपजीविका संकटात सापडली आहे. कुटुंबाची जबाबदारी पार पाडताना कामगारांवर अक्षरशः उपासमारीची वेळ येत असल्याचे मनसेने निदर्शनास आणले. पूर्वीही वेळेवर वेतन न मिळाल्याने अनेकांनी नाईलाजाने नोकरी सोडावी लागली होती. त्यामुळे अशा पुनरावृत्तीला आळा घालण्यासाठी संबंधित ठेकेदारावर कडक कारवाई करून त्याचे मनपा ठेकेदारांच्या काळ्या यादीत समावेशन करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच सध्या कार्यरत असलेल्या सर्व कंत्राटी कामगारांना थकित वेतन तातडीने वितरित करण्याचे आदेश देण्याचीही विनंती मनसेने केली.

यावेळी जिल्हाध्यक्ष सचिन डफळ, शहराध्यक्ष गजेंद्र राशिनकर, शहर उपाध्यक्ष संदीप चौधरी, विभागाध्यक्ष प्रशांत जाधव, शहर सचिव डॉ. संतोष साळवे, रस्ते आस्थापना जिल्हाध्यक्ष विनोद काकडे, आरती उफाडे, तुषार हिरवे, दीपक दांगट आदी उपस्थित होते.

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# कोयटे पितापुत्रांच्या वक्तव्यांवर रणशूर-गंगवाल यांचा घणाघात

## जाहीर माफीची मागणी



**कोपरगाव । किसन पवार**

दिवंगत सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे व दिवंगत माजी खासदार शंकरराव काळे यांच्यावर अनाठायी गुन्हे दाखल असल्याचे वक्तव्य करणाऱ्या संदीप कोयटे यांनी जनतेची जाहीर माफी मागावी, अशी मागणी संतोष गंगवाल आणि जितेंद्र रणशूर यांनी पत्रकार परिषदेत केली. कोयटे यांच्या वक्तव्यामुळे कोल्हेकाळे समर्थकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले.

संतोष गंगवाल म्हणाले की, ''राजकीय पटलावरून २५ वर्षे गायब राहिल्यानंतर पुन्हा येऊन गंभीर आरोपांची सरबत्ती करणे चुकीचे ठरते.'' स्व. कोल्हे व स्व. काळे यांच्यावरील गुन्ह्यांचा संदर्भ हा राजकीय आंदोलनातून झालेल्या प्रकरणांशी होता; तो कोयटे पितापुत्रांवरील गुन्ह्यांप्रमाणे नाही, असा दावा त्यांनी केला. यावेळी काका कोयटे आणि संदीप कोयटे यांच्यावरील विविध गुन्हे तसेच कॅनरा बँकेतील मोठ्या आर्थिक गैरव्यवहारांबाबतची नोटीसही पत्रकार परिषदेत वाचून दाखवण्यात आली. ''स्वच्छ असल्याचा दिखावा करू नका,'' असा घणाघात गंगवाल यांनी केला. जितेंद्र रणशूर यांनीही कोयटे यांच्यावर तीव्र शब्दांत टीका केली. ''नावात समता असली तरी वागण्यात विषमता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयीचे प्रेम हा केवळ दिखावा आहे,'' असा आरोप त्यांनी केला. तसेच निवडणूक आयोग व प्रशासनाविरोधात डॉ. आंबेडकर स्मारकाजवळ केलेल्या काळ्या फितीच्या आंदोलनाचाही त्यांनी निषेध नोंदवला. ''राज्यातील २४ नगरपालिका आणि कोपरगावसह ४ नगरपालिकांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. तरी फक्त कोपरगावातच कोल्हे गटावर आरोप करणे म्हणजे दिशाभूल करणारी भूमिका,'' असे रणशूर यांनी म्हटले. न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या असून विरोधक अपूर्ण अभ्यासामुळे जनतेमध्ये चुकीची माहिती पसरवत असल्याचा आरोप त्यांनी केला. ''भाजप व लोकसेवा आघाडी दिशाभूल करणाऱ्या राजकारणाचा निषेध करते,'' असे रणशूर यांनी स्पष्ट केले. रयत समाचार

> शहरातील आंबेडकरी समाज त्यांना आणि त्यांच्या भूमिकेला चांगल्याप्रकारे ओळखतो, असे त्यांनी स्पष्ट केले. समता पतसंस्थेत दलित समाजातील व्यक्तीला एकदाही व्हाइस चेअरमनपद न देणे हेच कोयटे यांच्या भूमिकेचे खरे चित्र असल्याचे रणशूर म्हणाले.

## श्रीगोंदा-शिरूर बसफेऱ्या कमी विद्यार्थी संतप्त, आंदोलनाचा इशारा



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा-शिरूर मार्गावर एसटी बसफेऱ्या कमी केल्याने विद्यार्थी आणि प्रवाशांचे हाल वाढले असून १५ डिसेंबर रोजी श्रीगोंदा आगारासमोर धरणे आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. रस्त्याच्या कामामुळे बसफेऱ्या कमी झाल्या असून खाजगी वाहतूकही बंद असल्याने प्रवाशांकडे पर्याय उरलेला नाही.

फेऱ्यांची अनियमितता गंभीर स्वरूप धारण करत आहे. काहीवेळा दोनतीन तास बस उपलब्ध नसते, तर काही वेळा एकामागून अनेक बस एकत्र धावताना दिसतात. यामुळे विद्यार्थ्यांना शाळाकॉलेजला जाण्यायेण्यात उशीर होत आहे. वाढलेल्या गर्दीमुळे ढकलाढकली, चोरीची प्रकरणेही वाढली आहेत. अलीकडेच एका विद्यार्थिनीचा बसमध्ये चढताना अपघात झाला असल्याची तक्रार करण्यात आली. शिरूरश्रीगोंदा शेवटची बस रात्री उशिरा सुटत असल्याने सुरक्षा धोक्यात येत असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. प्रत्येक ३० मिनिटांनी बस सोडावी, पहिल्या फेऱ्या लवकर सुरू कराव्यात, बसचे नियोजन सुधारावे, शेवटची बस सायंकाळी वेळेवर सोडावी आणि या मार्गावर चांगल्या स्थितीतील बस नेमाव्यात, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

मागण्या मान्य न झाल्यास १५ डिसेंबर रोजी धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा प्रवाशांनी दिला आहे.

## प्रकाश कुलथे यांना दर्पण पुरस्कार जाहीर

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**



राज्यस्तरीय आचार्य बाळशास्त्री जांभेकर 'दर्पण पुरस्कार' दैनिक स्नेहप्रकाशचे मुख्य संपादक प्रकाश बापूराव कुलथे यांना जाहीर झाला आहे. ६ जानेवारी पत्रकार दिनी कोकणातील पोंभुर्ले (ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग) येथील बाळशास्त्री जांभेकर स्मारक दर्पण सभागृहात हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीतर्फे दरवर्षी दिला जाणारा हा अत्यंत मानाचा पुरस्कार पत्रकारिता क्षेत्रातील सर्वोच्च राज्यस्तरीय सन्मान मानला जातो. राज्यातील अनेक नामवंत संपादक व ज्येष्ठ पत्रकारांना यापूर्वी हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

प्रकाश कुलथे हे गेली सुमारे ३५ ते ४० वर्षे वृत्तपत्र क्षेत्रात कार्यरत आहेत. दैनिक स्नेहप्रकाश या दैनिकाचे मुख्य संपादक म्हणून त्यांनी पत्रकारितेत मोलाची कामगिरी बजावली असून साप्ताहिक वर्ल्ड सामना चे संस्थापक संपादकही आहेत. तसेच वृत्तपत्र व प्रसारमाध्यम राज्य अधिस्वीकृती समितीचे सदस्य, शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधीचे विश्वस्त, श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर लाड सुवर्णकार संस्था (त्र्यंबकेश्वर, नाशिक) चे उपाध्यक्ष, महाराष्ट्र संपादक परिषद (मुंबई) चे कार्याध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद (शाखा श्रीरामपूर) चे कार्याध्यक्ष, श्रीरामपूर पत्रकार संघाचे सचिव म्हणून त्यांनी जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. नुकतीच त्यांची इंडियन लँग्वेजेस न्यूजपेपर असोसिएशन या राष्ट्रीय संघटनेवर सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे.

साहित्य क्षेत्रातही त्यांनी स्नेहप्रकाश प्रकाशन च्या माध्यमातून शेकडो पुस्तके प्रकाशित करून लेखकांना प्रोत्साहन दिले असून त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते. आतापर्यंत अनेक राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या प्रकाश कुलथे यांना आता बाळशास्त्री जांभेकर दर्पण पुरस्कार जाहीर झाल्याने श्रीरामपूर शहर तसेच जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून हा सन्मान श्रीरामपूरकरांचा सन्मान असल्याचे मान्यवरांनी नमूद केले आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. रयत समाचार

## चैतन्य अर्बनची दिनदर्शिका प्रकाशित



**पाथर्डी । नितीन गटाणी**

सोशल मीडियाच्या जमान्यातही दिनदर्शिकेचे महत्त्व कायम असून चैतन्य अर्बन संस्थेने वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपातील दिनदर्शिका प्रकाशित करून श्रीक्षेत्र अयोध्या येथील प्रभू रामचंद्रांचे सहज दर्शन घडविले आहे. ''ईश्वराचे अधिष्ठान असलेल्या संस्था अथवा भाविक जीवनामध्ये सर्वच क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतात,'' असे प्रतिपादन येळी येथील महंत रामगिरी महाराज यांनी केले.

येथील चैतन्य अर्बन संस्थेच्या वतीने पुढील वर्षाची दिनदर्शिका समारंभपूर्वक प्रकाशित करण्यात आली. या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, तुकाराम चन्नेमहाराज, वनविभागाचे बबन मंचरे, एकनाथ ढोले, डॉ. श्रीधर देशमुख, डॉ. सुहास उरणकर, कारभारी वाघ, बाबासाहेब बांगर, प्रशांत शेळके, उद्योजक सुशील बाहेती, तुकाराम भांगे यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. गेल्या पाच वर्षांपासून संस्थेच्या वतीने विशिष्ट ज्ञानवर्धक माहितीसमेत दिनदर्शिका प्रकाशित केली जाते आणि ती नागरिकांना मोफत वितरित केली जाते. संस्थेच्या या सेवाभावी उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. जानेवारी महिना सुरू होण्याआधी प्रसिद्ध होणाऱ्या या दिनदर्शिकेचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

यावेळी बोलताना रामगिरी महाराज म्हणाले की, ''चैतन्य अर्बन संस्थेचे संस्थापक अनंत ढोले आणि संपूर्ण ढोले परिवार समाजसेवा, धर्मसेवा आणि व्यावसायिक सचोटीमध्ये अग्रेसर आहेत. दरवर्षी आध्यात्मिक व पौराणिक विषयांवर आधारित या संस्थेकडून शहरवासीयांना दिली जाणारी अनोखी भेट कौतुकास्पद आहे. या उपक्रमाचा आदर्श इतर संस्थांनी घ्यावा.''

महाराज पुढे म्हणाले की, दिनदर्शिका केवळ भिंतीवर लावण्याची वस्तू नसून प्रत्येक कुटुंबाचा एक भावनिक घटक बनते. या माध्यमातून संस्थेबरोबर लोकांचे स्नेहबंधन दृढ होत जाते आणि संस्था हेच मोठे कुटुंब बनते. ''जीवनातील प्रत्येक कृतीला अध्यात्माची जोड असेल तर त्या कृतींमध्ये ईश्वरी शक्तीचा अनुभव येतो. संस्थेने दिनदर्शिकेद्वारे अल्प, सोप्या आणि समर्पक शब्दांत धर्मज्ञान उपलब्ध करून दिल्यास लोक त्याची कात्रणे संग्रहितही करतील,'' असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष अनंत ढोले यांनी उपक्रमाची माहिती आणि संस्थेची वाटचाल प्रास्ताविकातून मांडली. सूत्रसंचालन भोलेनाथ मर्दाने यांनी केले, तर आभार बंडोबा आंधळे यांनी व्यक्त केले.

## एफआरपीची ३८ कारखान्यांकडे १४० कोटी थकबाकी

### खुद्द सहकारमंत्र्यांकडे ९ कोटी



**श्रीरामपुर । शफीक बागवान**

राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देय असलेली एफ. आर. पी वेळेत न मिळण्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. राज्यातील तब्बल ३८ साखर कारखान्यांनी एकूण १४० कोटी रुपयांचे एफ.आर.पी थकवल्याची धक्कादायक माहिती अहवालातून समोर आली आहे.

विशेष बाब म्हणजे, राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या मालकीच्या सिद्धी शुगर अॅण्ड अलाईड इंडस्ट्रीज या कारखान्याकडूनही जवळपास ९ कोटी रुपयांची एफ.आर.पी. थकबाकी असल्याचे उघड झाले आहे.एफ. आर.पी. हा ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा मूलभूत हक्क मानला जातो. कापणीवाहतूक खर्च वजा न करता ऊसाच्या भावाची निश्चिती करण्यात येते. नियमांनुसार, कारखान्याने ऊस खरेदी केल्यानंतर १४ दिवसांच्या आत एफ.आर.पी. ची रक्कम अदा करणे बंधनकारक आहे; मात्र, अनेक कारखान्यांकडून हा नियम पाळला जात नसल्याचे उघड झाले आहे.

दरम्यान, सहकार मंत्र्यांच्या कारखान्यानेच पैसे थकवले असल्याने वादाची परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकरी संघटनांनी यावर टीकास्त्र सोडत सरकारने तातडीने हस्तक्षेप करून थकीत रकमेची वसुली करावी, अशी मागणी केली आहे.

> **सरकारने थकीत वसुली करावी.** साखर आयुक्तालयाच्या नुसार, थकबाकी असलेल्या ३८ कारखान्यांवर पुढील कारवाईचा प्रस्ताव विचाराधीन आहे. शेतकऱ्यांचे पैसे थकवणाऱ्या कारखान्यांवर दंड, व्याज आकारणी, लाइसन्स रद्द करणे, तसेच पुढील हंगामासाठी परवानगी न देणे अशा उपाययोजनांवरही विचार सुरू आहे.

> ऊस खरेदी करताना साखर कारखाने शेतकऱ्यांना देत असलेला प्रतिटन आधारभूत दर तसेच ऊस पिकवण्यासाठी होणारा एकूण खर्च आणि त्यावर अंदाजे १५ टक्के नफा विचारात घेऊन हा दर निश्चित केला जातो. २००९ पूर्वी ऊसदर नियंत्रण कायदा १९६६ मधील कलम ३ नुसार केंद्र सरकार प्रत्येक साखर हंगामासाठी ऊसाचा वैधानिक किमान भाव जाहीर करत असे. मात्र, २२ ऑक्टोबर २००९ रोजी या कायद्यात सुधारणा करण्यात आली आहे.

## किस्से निवडणुकीचे...

### मतदारांना प्रतीक्षा आपल्या खासदारांची

**सलीमखान पठाण**

श्रीरामपूर नगरपालिका निवडणुकीसाठी नुकतेच मतदान पार पडले. प्रमुख पक्षांच्या नेतेमंडळींनी शहरातील विविध प्रभागांत भेटी देत सभा, पदयात्रा आणि बैठकींद्वारे मतदारांना पक्षाच्या उमेदवारांच्या समर्थनाचे आवाहन केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार सुजय विखे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे राष्ट्रीय महासचिव अविनाश आदिक, आमदार हेमंत ओगले आदींनी आपल्या पक्षाच्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या उमेदवारांसाठी प्रचार केला.

मात्र, या उत्साही निवडणूक प्रचारात ज्या नेत्यांची स्पष्ट उणीव जाणवली, ते शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे. संपूर्ण निवडणूक प्रचारात त्यांचे शहरात कुठेही दर्शन झाले नाही. यामुळे मतदारांमध्ये विविध चर्चा रंगल्या.

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेने या निवडणुकीत महाविकास आघाडीबरोबर न जाता स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतला. स्थानिक नेते अशोकमामा थोरे स्वतः नगराध्यक्षपदाचे उमेदवार ठरले, तसेच ११ प्रभागांत नगरसेवक पदासाठी उमेदवार उभे केले. सर्व ३४ जागांवर उमेदवार न देऊ शकल्याने या निर्णयामागील कारणांबाबत शहरात विविध तर्कवितर्क लावले जात आहेत.

लोकसभा निवडणुकीतही खासदार वाकचौरे यांच्या प्रचारातील अनुपस्थितीची नोंद अनेक मतदारांनी घेतली होती. काही भागांत ते अत्यल्प दिसले, तरीही वार्ड क्र. १ आणि २ मधील मतदारांनी सकाळपासून रांगा लावून त्यांना मतदान केले होते. मात्र निवडून आल्यानंतरही त्यांचा श्रीरामपूरमध्ये नियमित संपर्क अथवा उपस्थिती फारशी दिसली नाही, असे मतदारांचे म्हणणे आहे.

शिर्डी मतदारसंघातील प्रमुख शहर म्हणून श्रीरामपूरला खासदारांनी सातत्याने भेट द्यावी, नागरिकांच्या अडचणी ऐकाव्यात व त्यावर मार्गक्रमण करावे, अशी अपेक्षा अनेक मतदारांनी व्यक्त केली. खासदारांच्या अनुपस्थितीत केंद्र सरकारशी संबंधित प्रश्न, पायाभूत सुविधांसाठीचा पाठपुरावा, केंद्र शासनाच्या योजना, तसेच खासदार निधीची मागणीहे सर्व कोणाकडे मांडायचे असा प्रश्नही आता नागरिक उपस्थित करत आहेत.

खासदार वाकचौरे प्रकृती अस्वास्थ्यामुळे प्रचारात सहभागी झाले नाहीत की इतर काही कारणांमुळे त्यांनी या निवडणुकीपासून दूर राहणे पसंत केले, याबाबत शहरात विविध चर्चा सुरू आहेत. श्रीरामपूरकरांना त्यांची उपस्थिती आणि उपलब्धता कमी असल्याची खंत व्यक्त केली जात असून, त्यांनी शहराला नियमित वेळ देऊन मतदारांचा विश्वास दृढ करावा, अशी अपेक्षा मतदारांमध्ये वाढू लागली आहे.



## भि.ग. रोहमारे साहित्य पुरस्कार सोहळा दिमाखात




**कोपरगाव । किसन पवार**

के. बी. रोहमारे यांचे २८ वे पुण्यस्मरण व भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार वितरण सोहळा कोपरगाव येथील के. जे. सोमैया वरिष्ठ व के. बी. रोहमारे कनिष्ठ महाविद्यालयातील सभागृहात दिमाखात पार पडला. या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या राजकीय व सांस्कृतिक परंपरेचा ठसा उमटवणाऱ्या के. बी. रोहमारे यांच्या कार्याचा गौरवपूर्ण स्मरणोत्सव साजरा झाला.

समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून बोलताना अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष उत्तम कांबळे म्हणाले, ''महाराष्ट्राच्या राजकीय चारित्र्याचा इतिहास लिहायचा झाला तर के. बी. रोहमारे या व्यक्तिमत्त्वाला स्वतंत्र अध्याय द्यावा लागेल. आजच्या राजकारणातील नागवेपण संपवण्यासाठी केबींसारख्या तत्त्वनिष्ठ नेतृत्वाची गरज आहे.'' के. बींनी कृष्णाकाठच्या चळवळीप्रमाणे गोदाकाठी परिवर्तन घडवून आणले असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र विधानपरिषदेचे माजी सदस्य डॉ. सुधीर तांबे होते. ते म्हणाले, ''के. बी. रोहमारे यांनी शेतकरी, शेतमजूर, सर्वसामान्य जनतेला संघटित करून सक्षम करण्याची मोठी कामगिरी केली. ग्रामीण जीवनाचा कळवळा असलेल्या त्यांच्या पिढीने सहकार व समाजकारणाच्या क्षेत्रात भक्कम पायाभरणी केली. आज प्रतिक्रांतीच्या वाऱ्याला रोखण्याची जबाबदारी पुरस्कारप्राप्त साहित्यिकांची आहे.'' भि. ग. रोहमारे ट्रस्टचे अध्यक्ष अशोक रोहमारे यांनी ट्रस्टच्या कार्याचा आढावा घेताना सांगितले की, गेली ३६ वर्षे हा पुरस्कार कोणत्याही बाह्यहस्तक्षेपाविना ग्रामीण साहित्यिकांना दिला जात आहे. ''या पुरस्कारामुळे अनेक नवोदित ग्रामीण लेखकांना साहित्य अकादमीसह राष्ट्रीय स्तरावरील मान-सन्मान मिळाले आहेत,'' असे त्यांनी नमूद केले. सर्वोत्कृष्ट ग्रामीण कादंबरीसाठी 'नांगरमुठी'चे लेखक पांडुरंग पाटील (कोल्हापूर), ग्रामीण कथासंग्रहासाठी 'मोहरम'चे लेखक डॉ. हंसराज जाधव (पैठण), ग्रामीण कविता संग्रहासाठी सचिन शिंदे (यवतमाळ) व सागर जाधव जोपुळकर (नाशिक), तर ग्रामीण समीक्षेसाठी डॉ. नारायण शिवशेट्टे (नांदेड) व ग्रामीण आत्मकथनासाठी भारत सातपुते (लातूर) यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. या प्रसंगी पुरस्कारप्राप्त साहित्यिकांनी आपले मनोगत व्यक्त केले. ''भि. ग. रोहमारे पुरस्कार हा आमच्यासाठी साहित्य अकादमी समान मानाचा आहे,'' असे पांडुरंग पाटील यांनी सांगितले. तर कवी सागर जाधव यांनी स्वतःची कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. विजय ठाणगे यांनी केले. पुरस्कार योजनेचे कार्यवाह डॉ. जिभाऊ मोरे यांनी पुरस्काराच्या इतिहासाची माहिती दिली. यावेळी रोहमारे कुटुंबीय, कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त, प्राध्यापक, साहित्यिक, पत्रकार व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. शैलेंद्र बनसोडे व प्रा. वर्षा आहेर यांनी केले. आभार डॉ. रवींद्र जाधव यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील अधिकारी, प्राध्यापक वर्ग व सेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# भ्रष्टाचार देशाला लागलेली किड

आज ९ डिसेंबर, आजचा दिवस संपूर्ण जगात भ्रष्टाचार विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. भ्रष्टाचार ही आज जगातील सर्वात मोठी समस्या बनली आहे. भारतातच नाही तर जगात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस येताहेत. जगात असा एकही देश नाही जिथे भ्रष्टाचार होत नाही. भारतात तर भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनलाय. जगातील सर्वाधिक भ्रष्ट देशांच्या यादीत भारताचा क्रमांक लागतो ही खेद जनक बाब.

भ्रष्टाचाराची ही किड भारतात खोलवर रुजली. भ्रष्टाचाराची ही किड देश पोखरत चालली. भारतातील भ्रष्टाचार कमी करणार असे सर्वच राजकीय पक्ष सांगतात. देशातील भ्रष्टाचार संपवणार अशी भीष्म प्रतिज्ञाच काही राजकीय आणि सामाजिक नेत्यांनी केली होती पण देशातील भ्रष्टाचार संपवणे तर दूरच पण देशातील वाढता भ्रष्टाचार कमी करणे देखील यांना जमले नाही.

अमेरिकेतील वॉशिंग्टन येथील ग्लोबल फायनांशियल इंटिग्रेटी या भ्रष्टाचारावर सर्व्हे करणाऱ्या संस्थेने मागील वर्षी एक अहवाल सादर केला होता. या अहवालानुसार गेल्या सत्तर वर्षात लाचखोरीमुळे देशाचे ४५० अब्ज डॉलरचे नुकसान झाले. ४५० अब्ज डॉलर ही काही कमी रक्कम नाही. भ्रष्टाचारी लोकांनी देशाचे ४५० अब्ज डॉलर पचवले. हे ४५० अब्ज डॉलर गोरगरिबांच्या मेहनतीचे होते मात्र भ्रष्टाचाऱ्यांनी खुर्ची आणि पदाचा गैरवापर करून गोरगरिबांना फसवले आणि त्यांच्या मेहनतीचे पैसे लाटले.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

देशाला लागलेली भ्रष्टाचाराची ही किड काही आज लागलेली नाही. देशाच्या स्वातंत्र्यापासून भ्रष्टाचार सुरू आहे. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू एकदा उद्विग्न होऊन म्हणाले होते की भ्रष्टाचाऱ्यांना सुळावर लटकवले पाहिजे. मात्र आजवर एकाही भ्रष्ट अधिकाऱ्याला किंवा नेत्याला सुळावर लटकावणे तर दूरच पण मोठी शिक्षा झाल्याचेही ऐकिवात नाही. विशेष म्हणजे ज्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना किंवा नेत्यांना लाचखोरी किंवा भ्रष्टाचारासाठी अटक होते ते नेते किंवा अधिकारी पुन्हा काही दिवसांनी त्याच खुर्चीवर विराजमान झाल्याचे पाहायला मिळतात. अटक होऊन काही दिवसांची शिक्षा भोगूनही भ्रष्टाचारी पुन्हा त्याच खुर्चीवर बसत असल्यानेच भ्रष्टाचार कमी होत नाही. भ्रष्टाचारी समजात उजळ माथ्याने फिरत असतात कारण त्यांना कायद्याची भीती आणि मनाची चाड नसते. दररोजचे वर्तमानपत्र वाचा त्यात तुम्हाला एकतरी लाचखोरीची किंवा भ्रष्टाचाराची बातमी वाचायला मिळेलच. एका एका अधिकाऱ्यांकडे कैक कोटींची अवैध मालमत्ता आढळत आहे.

असा एकही विभाग नाही ज्यात भ्रष्टाचार होत नाही. महसूल आणि पोलिस विभाग भ्रष्टाचारात अव्वल असले तरी सर्वच विभागात भ्रष्टाचार सर्रास सुरू आहे. आता तर शिक्षणासारखे पवित्र क्षेत्र देखील भ्रष्टाचाराने बरबटले आहे. जो विभाग समाजाला नैतिकतेचे धडे देतो त्याच विभागात भ्रष्टाचारासारखे अनैतिक काम राजरोसपणे चालू आहे.

देशातील भ्रष्टाचार कमी व्हावा यासाठी समाजसेवक अण्णा हजारे, योग गुरू बाबा रामदेव यांच्यासह हजारो कार्यकर्ते दिल्लीच्या जंतरमंतर वर उपोषणाला बसले होते. त्यांच्या आंदोलनाला जनतेतूनही मोठा पाठिंबा मिळाला होता. आता सत्तेत असलेल्या भाजपनेही त्या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. देशभर भ्रष्टाचार विरोधी वातावरण निर्माण झाले होते. त्यावेळी देशातून भ्रष्टाचार कमी होईल असे वाटले होते मात्र भ्रष्टाचार तसूभरही कमी झाला नाही. विशेष म्हणजे त्या आंदोलनाचे नेतृत्व करणारे एक नेते आज भ्रष्टाचार केला म्हणूनच जेलमध्ये आहेत.

त्या आंदोलनाचा सर्वाधिक फायदा भाजपला झाला. भाजप केंद्रात सत्तेवर आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ना खाउंगा... ना खाने दुंगा... असा सज्जड दम भ्रष्टाचाऱ्यांना दिला. देशातील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटबंदी केली. लोकांना वाटले आता तरी भ्रष्टाचार कमी होईल पण तसे झाले नाही उलट भ्रष्टाचारात वाढच झाली. त्यातही गंमत म्हणजे ज्या भ्रष्टाचाऱ्यांना विरोध करून भाजप सत्तेत आली आज त्याच भ्रष्टाचाऱ्यांना पक्षात घेऊन भाजप पावन करत आहे.

ट्रेस मेट्रिक्स २०२१ च्या अहवालात भारत लाचखोरीत इतर देशांच्या तुलनेत खूप पुढे आहे. याचाच अर्थ देशातील भ्रष्टाचार कमी झालेला नाही उलट वाढलाच आहे. आज कोणत्याही कार्यालयात चिरीमिरी दिल्याशिवाय काम होत नाही. जनताही मजबूर आहे. याच मजबुरीचा फायदा घेऊन भ्रष्टाचारी त्यांना जाळ्यात अडकवत आहेत. लाच दिली नाही तर काम होत नाही असाच अनुभव देशातील बहुतांशी जनतेला आला आहे.

राजस्थानातील ८० टक्के लोकांनी हे मान्य केले आहे की कोणतेही काम करण्यासाठी लाच द्यावीच लागते. महाराष्ट्रातील ५५ टक्के लोकांचेही हेच म्हणणे आहे. याचाच अर्थ लाचखोरी सामान्य होत आहे. पूर्वी भ्रष्टाचाऱ्यांकडे द्वेष भावनेने पाहिले जायचे आता मात्र त्यांच्या संपत्तीवरून त्यांचा सन्मान होत आहे. आज भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे.

# अगस्ती विद्यालयाच्या हासे, शिंदे यांची राज्यस्तरीय नेटबॉल स्पर्धेसाठी निवड

**अकोले । सतीश पाचपुते**

येथील श्री अगस्ती एज्युकेशन सोसायटीच्या अगस्ती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अकोले येथील विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात आणखी एक यशाची भर घातली आहे. विद्यालयातील पार्थ हासे आणि प्रांजल शिंदे यांची राज्यस्तरीय नेटबॉल स्पर्धे साठी निवड झाली असून विद्यालयाच्या क्रीडा परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला.



महाराष्ट्र शासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगरतर्फे दरवर्षी विविध क्रीडा प्रकारांसाठी राज्यस्तरीय निवड चाचण्या घेतल्या जातात. यावर्षी संगमनेर येथे पार पडलेल्या नेटबॉल विभागीय स्पर्धेत अगस्ती विद्यालयाचे पार्थ हासे व प्रांजल शिंदे यांनी उत्कृष्ट कौशल्य दाखवत राज्यस्तरासाठी पात्रता मिळवली. त्यांच्या या कामगिरीमुळे शाळा, संस्था तसेच अकोले तालुक्यातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

अगस्ती विद्यालयाने गेल्या अनेक वर्षांत जिल्हा, विभागीय आणि राज्यस्तरीय विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सातत्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ग्रामीण भागातील असूनही विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीत कठोर परिश्रम करत शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या खेळात सातत्य ठेवले आहे. पार्थ हासे आणि प्रांजल शिंदे यांनी यापूर्वीही जिल्हा व विभागीय स्तरावर चमकदार कामगिरी केली असून राज्यस्तरावरील सातत्यपूर्ण कामगिरीमुळे ते सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत.

विद्यालयात पारंपरिक खेळांसोबत नवनवीन खेळ प्रकारांना प्रोत्साहन दिले जात असल्याने विद्यार्थी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळांसाठी आवश्यक कौशल्य आत्मसात करत आहेत. संस्थेच्या माध्यमातून उपलब्ध करून दिले जाणारे क्रीडा साहित्य आणि सुविधा विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी मोठा आधार ठरत असल्याचे चित्रही दिसून येत आहे.

राज्यस्तरीय निवडीबद्दल संस्थेच्या सचिव शैलजा पोखरकर, कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी, प्राचार्य मंगेश खांबेकर, उपमुख्याध्यापक तात्यासाहेब दौंड, पर्यवेक्षिका नंदा गोपाळे, शिक्षकपालक संघ, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी तसेच सर्व शिक्षकशिक्षकेतर कर्मचारी आणि पालकवर्ग यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. रयत समाचार

# अभिनेते धर्मेंद्रसह मान्यवरांना विधानसभेत श्रद्धांजली

बेळगाव । श्रीकांत काकतीकर

कर्नाटक विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनाला आज सुवर्ण सौध येथे सुरूवात झाली. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विधानसभा आणि विधान परिषदेत दिग्गज अभिनेते व माजी खासदार धर्मेंद्र यांच्यासह अन्य दिवंगत मान्यवरांना श्रद्धांजली वाहण्यात आली. धर्मेंद्र यांच्या निधनामुळे देशाने एक लोकप्रिय, सर्वमान्य आणि महान कलाकार गमावल्याचे सभागृहात व्यक्त करण्यात आले.

धर्मेंद्र यांनी १९६० मध्ये चित्रपटसृष्टीत प्रवेश केला आणि ३०० हून अधिक चित्रपटांत काम करत हिंदी तसेच कन्नड चित्रपटसृष्टीत मोठे योगदान दिले. शोलेसह अनेक चित्रपटांना राष्ट्रीय स्तरावर मोठी प्रसिद्धी मिळाली. निर्माते म्हणूनही त्यांनी विजयता फिल्म्सच्या माध्यमातून यशस्वी चित्रपटांची निर्मिती केली. २००४०९ या कालावधीत ते बिकानेरचे लोकसभा सदस्य होते. कला क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना पद्मभूषण, तसेच अनेक लाईफटाईम अचिव्हमेंट आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. धर्मेंद्र यांच्यासह माजी सदस्य के. नरहरी, आर. व्ही. देवराज, हुल्लाप्पा मेती, लोकसाहित्यकार डॉ. एन. आर. नायक, कादंबरीकार एस. एल. भैरप्पा, पत्रकार टी. जे. एस. जॉर्ज, गायिका अनुराधा धारेश्वर, पद्मश्री सालुमारदा थिम्मक्का आणि विनोदी कलाकार म्हैसूर श्रीकंठैया उमेश आदी दिवंगत मान्यवरांनाही सभागृहात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



सभागृह नेते बोसराजू, विरोधी पक्षनेते आणि सदस्यांनी दिवंगत व्यक्तींप्रति आदर व्यक्त केला. यावेळी सभागृहात एक मिनिट मौन पाळण्यात आले.

# शाळांचे खाजगीकरण; विनाशाकडे टाकलेले पाऊल- डॉ. जी.पी. ढाकणे


**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

**एखाद्या देशाला युद्ध करून पराजित करण्यापेक्षा डोके वापरून बुद्धीभेद करून, जनतेला फुकटच्या अन्नधान्याची सवय लावून आणि शिक्षणापासून वंचित ठेवल्यास त्या देशाला गुलामगिरीकडे नेता येऊ शकते. सध्या भारताची आणि महाराष्ट्राची वाटचाल गुलामगिरीच्याच दिशेने सुरू झाली आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही, असे मत बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. जी.पी. ढाकणे यांनी व्यक्त केले.**

सध्या होत असलेली शैक्षणिक आबाळ व सामाजिक प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात डॉ. ढाकणे यांनी म्हटले आहे की, सध्याचे सरकार हे जनतेचे नसून व्यापाऱ्यांचे सरकार आहे. एकीकडे मराठा आणि ओबीसींना आरक्षणाचे गाजर दाखवायचे आणि दुसरीकडे सरकारी नोकरी बंद करून खाजगी ठेकेदारांकडून नोकर भरती करायची. तसेच लोकसेवा आयोगादी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरवून मागच्या दाराने सचिव पदाच्या भरती करायच्या. वरीष्ठ महाविद्यालय व विद्यापीठात एम फील, पीएचडी तथा नेट-सेट असे उच्च शिक्षित तज्ञ उमेदवार डावलून कार्पोरेट क्षेत्रातील सरकारची तळी उचलून धरणारे तथाकथित अनुभवी लोकांना प्रोफेसर म्हणून भरती करून घ्यायचे. त्याप्रमाणे सर्व सरकारी शाळांचे खाजगीकरण करून सरकार शिक्षण हक्क कायद्याला डावलत आहे आणि मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणापासून पळ काढत आहे. ही अतिशय धक्कादायक बाब असून देशाची वाट गुलामगिरीच्या दिशेने सुरू झाली आहे असे ठामपणे म्हणता येईल.

विद्यार्थी आणि तरुण हे देशाचे भविष्य मानले जातात म्हणून भारतीय राज्यघटनेच्या कलम ४५ नुसार १४ वर्षाखालील प्रत्येक मुला-मुलींना मोफत आणि सक्तीचे दर्जेदार शिक्षण देणे राज्य सरकारला बंधनकारक आहे. शिक्षण हक्क कायदा २००९ नुसार शिक्षण मिळणे हा बालकांचा मूलभूत अधिकार आहे. स्वतःला विश्वगुरू म्हणणाऱ्या देशात ८० टक्के जनता ही गरीब आहे. या गरीब जनतेची मुले सरकारी शाळेत शिक्षण घेत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, ‘‘शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, हे दूध जो पिणार तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.‘‘ शिक्षणाचे महत्त्व जाणून महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांनी ब्राह्मण समाजाचा जाच सहन करून त्यावेळी मुलामुलींना शिक्षण दिले होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची, बापूजी साळुंखे यांनी स्वामी शिक्षण संस्थेची व डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना करून कमवा आणि शिका सारख्या योजना राबवून मागास व अल्प उत्पन्न गटाच्या आणि गोरगरिबांच्या मुलांना शिक्षित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षणाला अतिशय महत्त्व दिलेले दिसते.

शिक्षण हे जीवन जगण्याची गुरुकिल्ली आहे. जीवन म्हणजे काय ? जीवन का आणि कसे जगावे ? जीवनाची सार्थकता कशात आहे ? जीवन परिपूर्ण कसे करावे आणि जीवनातून काय घ्यावे, इतरांना काय द्यावे या सर्व प्रश्नांची उत्तरे शिक्षणातूनच मिळतील. शिक्षणामुळे माणूस शहाणा होतो आणि गुलामगिरीच्या बेड्या जुगारू शकतो म्हणून पूर्वीच्या काळी तत्कालीन ब्राह्मणी व्यवस्थेने बहुजन मुलांस शिक्षण घेण्यास बंदी केली होती. तद्ववतच महिलांनाही शिक्षण घेण्यास बंदी होती. बहुजन म्हणजे शूद्र नसून बारा बलुतेदार १८ पगड जातीतील सर्व घटक होत. तसेच ब्राह्मण आणि उच्चवर्णीय सोडून सर्व जाती जमाती म्हणजेच बहुजन होय. हल्लीची बहुजनांची मुले शिक्षण घेऊन पुढे जात असल्यामुळे नोकरी आणि शिक्षणात खाजगीकरण करून बहुजनांच्या प्रगतीच्या मुळावरच घाव घालण्याचे षडयंत्र सुरू आहे. सरकारने नुकताच जिल्हा परिषदेच्या हजारो शाळांच्या खाजगीकरणाचा अध्यादेश काढला आहे. व्यापाऱ्यांनी ठराविक पैसे देऊन शाळेला आपले नाव देणे, ती शाळा चालवण्याची जबाबदारी घेणे, त्यातून पैसा कमावणे, आलेल्या पैशातून शाळांची सुधारणा करणे आणि दर्जेदार (?) शिक्षण देण्याची वेगळी योजना आहे. परंतु, ही योजना वरवर चांगली दिसत असली तरी गोरगरीब मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे भयानक षडयंत्र आहे.



देशाच्या उज्ज्वल आणि वैभवशाली भविष्यासाठी समाजातील सर्व घटकांनी, विद्यार्थी, नागरिक व शिक्षकांनी एकत्रित येऊन शिक्षणाच्या खाजगीकरणाला विरोध केला पाहिजे. तरच सरकार गुलामांच्या पिढ्या निर्माण करण्यास प्रोत्साहन देणे बंद करील हे लक्षात घ्यावे.

– **डॉ. जी.पी. ढाकणे**, माजी प्राचार्य


अगदी उदाहरणच द्यायचे ठरले तर जीओने सुरुवातीला मोफत सिमकार्डचे वाटप केले आणि नंतर रिचार्जचे भरमसाठ दर कसे वाढवीत गेले हे आपण पहात आहोतच. त्यानुसार सुरुवातीला चांगले मोफत शिक्षण द्यायचे, सरकारी शाळा बंद पाडायच्या आणि मग मोठी रक्कम फी म्हणून उकळायची आणि गरिबांकडे पैसे नाहीत म्हणून त्यांना शिक्षण नाकारायचे. तीच अशिक्षित मुले गुन्हेगारीकडे वळतील, गुलामगिरी पत्करतील आणि पडेल ते काम करतील आणि पुढच्या अनेक पिढ्या गुलामगिरीत कशा जातील असे पद्धतशीरपणे षडयंत्र सुरू आहे. देशाला खरंच विश्वातील महान देश बनवायचे असेल तर मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाबरोबरच आरोग्य सुविधा मोफत पुरवायला हव्यात. अन्नधान्य, वीज किंवा नगदी पैसे असे काहीही देण्याची गरज नाही. मग या फुकट्या योजनांची गरजच भासणार नाही. अशा पायाभूत सुविधा शासनाने निर्माण करून द्याव्यात. १४० कोटी लोकसंख्या असलेल्या देशात बुद्धिजीवी मनुष्यबळ तयार होईल. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या बाबतीत जगात फक्त भारताचाच डंका वाजेल. भारताचा रुपया जगावर राज्य करील आणि आपल्याकडे एकाही देशाची वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत होणार नाही. फक्त स्वतःला विश्वगुरू म्हणवून घेत छाती पिटवून काही फायदा नाही. त्यासाठी जगाने तुम्हाला विश्वगुरू म्हटले पाहिजे, मानले पाहिजे. सध्या देशात व महाराष्ट्रात जे चालले आहे ते फार चांगले आहे असे मुळीच नाही. म्हणून यावर आवाज उठवणे अत्यंत गरजेचे आहे. शाळांचे खाजगीकरण शिक्षकांनाही देशोधडी लावण्याचे षडयंत्र आहे. शाळांचे खाजगीकरण केल्यानंतर कमी वेतनात शिक्षकांची नेमणूक केली जाईल. मग आर्थिक विवंचनेत असलेला शिक्षक काय शिकवणार ? म्हणून शिक्षकांनी आणि जनतेनेही रस्त्यावर उतरणे ही काळाची गरज आहे. मला काय करायचे, ही भूमिका सोडून सर्व समाज घटकांनी या विषयाचे गांभीर्य लक्षात घ्यावे.

# माणुसकीची अंत्ययात्रा कवितासंग्रहाचे उत्साहात प्रकाशन



**नवी मुंबई । भूषण तांबे**

कवी प्रदीप बडदे लिखित माणुसकीची अंत्ययात्रा कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा नवी मुंबईतील ज्ञानविकास, कोपरखैरणे येथे उत्साहात पार पडला. प्रमुख अतिथी चंद्रकांत जोरकर आणि अजित हरवडे यांच्या हस्ते काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. प्रदीप बडदे हे उत्कृष्ट कवी, लेखक, पत्रकार आणि गायक म्हणून बहुआयामी व्यक्तिमत्त्व मानले जाते. राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविलेल्या या अष्टपैलू कवीने साहित्य, पत्रकारिता आणि संगीत क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. कार्यक्रमाची सुरुवात अध्यक्ष नागेश हुलवळे, प्रमुख अतिथी जोरकर व हरवडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. मान्यवरांचा सत्कार संपन्न झाला. यावेळी कवी प्रदीप बडदे यांनी आपल्या मनोगतात संग्रहामागील प्रेरणा, अनुभव




आणि साहित्यिक प्रवास हृदयस्पर्शी शब्दांत मांडले. उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाला मराठी साहित्यविश्वातील नामांकित मान्यवरांची उपस्थिती लाभली. हर्षद पाटील, कल्पना म्हापुस्कर, जयेश मोरे, मनोज उपाध्याय, प्रकाश फर्डे, डॉ. स्नेहा राणे, किशोरी पाटील, उमा रावते, गोविंद पारकर, रश्मी राऊत, सुधाकर कांबळी, आनंद रांजणे, अनिल सोनवणे, महेश जरांडे आदींच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली.

कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष कल्पनाताई देशमुख, तर मार्गदर्शक ऋतुजा गवस होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुकूल माळी यांनी करत कार्यक्रमाला विशेष उंची प्राप्त करून दिली. शेवटी ॲड. शंकर बडदे यांनी मान्यवरांचे आभार मानले.